वाचले : १) साथरोग अधिनियम १८९७ (सन १८९७ चा अधिनियम क्रमांक ३)

२) मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दि. ९/८/२००९ रोजी दिलेल्या सूचना

३) दि. १०/८/२००९ रोजी मा. पालकमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सभेतील निर्णय

---

जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
सर्वसाधारण शाखा
क्र. पसद/कावि/५८४/२००९
दि. १०/८/२००९

**विषय :- स्वाईन फ्ल्यू या घातक साथ रोगाबाबत विशेष उपाययोजना व निर्बंध विहीत करणेबाबत.........**

## आदेश

ज्या अर्थी, स्वाईन फ्ल्यू इन्फ्ल्युएन्झा ए (एच१एन१) या आजाराचे रुग्ण पुणे शहरामध्ये जास्त प्रमाणात आढळून आले आहेत. सदरचे प्रमाण हे शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये जास्त प्रमाणात दिसून आलेले आहे व आता त्याची लागण नागरीकांमध्ये मोठया प्रमाणावर होत असल्याचे आढळून येत आहे. सदरचा संसर्ग सार्वजनिक गर्दीच्या ठिकाणी जास्त आढळून येत आहे. त्यामुळे सार्वजनिक गर्दीची ठिकाणे बंद ठेवणेबाबत नागरीकांकडून सतत मागणी येत आहे.

आज दि. १०/८/२००९ पर्यंत स्वाईन फ्ल्यू इन्फ्ल्युएन्झा ए (एच१एन१) चे एकूण २२१ रुग्ण सापडले असून त्यापैकी १४८ रुग्ण बरे होऊन घरी पाठविणेत आले आहेत. तसेच ७१ रुग्ण उपचार घेत आहेत व तीन रुग्णांचा मृत्यू झालेला आहे. ही परिस्थिती पहाता भविष्यात स्वाईन फ्ल्यूचा फैलाव जास्त प्रमाणात होण्याची शक्यता आहे. त्या संदर्भात मा. मुख्यमंत्री यांची बैठक झाली असून त्यामध्ये सार्वनिक ठिकाणे बंद ठेवणेबाबतचा निर्णय जिल्हा प्रशासनाकडे सोपविणेत आला आहे. त्यामुळे दि. १०/८/२००९ रोजी मा. पालक मंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करणेत आली होती. सदरच्या बैठकीत खबरदारीची उपाययोजना म्हणून पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे लष्कर छावणी, खडकी लष्कर छावणी व देहूरोड लष्कर छावणी हद्दीत व या लगतच्या परिसरातील गावांमधील सर्व चित्रपट गृहे ३ दिवस बंद ठेवणेबाबत ठरले.

त्या अर्थी, साथरोग अधिनियम १८९७ कलम २ (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, चंद्रकांत दळवी, जिल्हाधिकारी पुणे, पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे लष्कर छावणी, खडकी लष्कर छावणी व देहूरोड लष्कर छावणी हद्दीत व या लगतच्या परिसरातील गावांमधील सर्व चित्रपट गृहे मंगळवार दि. ११/८/२००९ ते गुरुवार दि. १३/८/२००९ या तीन दिवसांसाठी बंद ठेवणेचा आदेश देत आहे.

सदरचे आदेश माझे सही शिक्यानिशी दिले असे.

जिल्हाधिकारी पुणे